उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,
**औरंगाबाद**
**(अकृषिक शाखा)**

वाचा :- 1) शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र.एनएपी-2016/प्र.क्र.7/टी-1, दिनांक 22जानेवारी 2016.
2) महाराष्ट्र शासन, राजपत्र, महसूल व वनविभाग दिनांक 5 जानेवारी 2017.
3) मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आदेश क्र.2021/मशाका/जमीन-1/एनएपी-34/ प्र.क्र. 04 , दि.29/1/2021.
4) अर्जदार लिलाधर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा. श्री. संजय शामलाल व्यास रा. पहाडसिंगपुरा ता.जि. औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक 08.10.2021.
5) औरंगाबाद महानगर पालिका, औरंगाबाद बांधकाम परवाना क्रमांक 630/2021-22, फाईल क्रमांक-551/17/2021-22, दिनांक 14.12.2021.
6) अपर तहसीलदार, औरंगाबाद यांचे पत्र क्र.2021/जमा-2/कावि-1861, दिनांक 23/11/2021
7) भूसंपादन शाखा, उपविभागीय अधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांचे पत्र क्र.2021/अकृषिक /भूसं-नाहप्रप/कावि-32,दिनांक.13/12/2021.

जा.क्र.2021/एनएपी-34/अकृषिक/मौजे पहाडसिंगपुरा, ता.जि.औरंगाबाद/प्र.क्र.110 दिनांक 22/12/2021.

**परिशिष्ट "ब"**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 42-अ मधील तरतूदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमीनीच्या भोगवटदारास द्यावयाच्या सनदेचा नमुना.**

ज्याअर्थी, **अर्जदार** श्री. लिलाधर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा. श्री. संजय शामलाल व्यास रा. पहाडसिंगपुरा, ता. जि. औरंगाबाद यांनी जिल्हा **औरंगाबाद** तालुका **औरंगाबाद** मौजे **पहाडसिंगपुरा** च्या **ग. नं. 42/2** पैकी मधील चे **क्षेत्र 1500.00** चौ.मि. या जमीनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या कलम 42-अ च्या तरतूदीन्वये **निवासी (ग्रुप हौसिंग)** अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमीनीचा प्रशासक, औरंगाबाद महानगर पालिका औरंगाबाद या नियोजन प्राधिकरणाच्या बांधकाम परवाना क्रमांक 630/2021-22, फाईल क्रमांक- 551/17/2020-21, दिनांक 14.12.2021 अन्वये विकास परवानगी/**बांधकाम परवानगी** प्राप्त केली आहे, ज्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी, उक्त जमीनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम 47-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम रुपये 6,480/- **(अक्षरी सहा हजार चारशे ऐंशी रुपये फक्त)** चालान क्र MH010434044202122M, दिनांक 22/12/2021 रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त संहितेमधील तरतूदीच्या आणि तद्न्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतूदींना आणि खालील शर्तीना अधिन राहून उपरोक्त जमीनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिका-याच्या वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमीनीवर अनुज्ञेय करण्यांत आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम 42-अ अन्वये ही सनद देण्यांत येत आहे.

1) आकारणी : उक्त जमीनीचा भोगवटादार उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखित विकास / **बांधकाम परवानगी** प्राप्त झाल्यापासून दिनांक. 31 जूलै 2022 रोजी संपणा-या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रु. **0.72** पैसे प्रती चौ.मी. या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिका-याकडून वेळोवेळी निश्चित करण्यांत येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

2) उक्त जमीनीचा भोगवटादार उक्त जमीनीवर वसूली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

3) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून 30 दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना देणे भोगवटारावर बंधनकारक राहील.

4) उक्त जमीनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उपविभागीय अधिका-यांस, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतूदीअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशा इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोटकलम (2) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

5) अर्जदारास नियोजन प्राधिकरणाच्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

त्याची साक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यावतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक 22/12/2021 रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

(भोगवटादाराची स्वाक्षरी)

लिलाधर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे
प्रो. प्रा. श्री. संजय शामलाल व्यास

सही/-
(रामेश्वर रोडगे)
उपविभागीय अधिकारी
औरंगाबाद

(साक्षीदारांचे नांव व स्वाक्ष-या)

1)---करण अरुण देसाई

2)---दिपक राजाराम कुशाल्हे

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: अर्जदार लिलाधर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा. श्री. संजय शामलाल व्यास रा. पहाडसिंगपुरा, ता. जि. औरंगाबाद यांनी स्वाक्षरी केलेली आहे, ती हीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

1) मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, महानगर पालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
3) उप अधिक्षक, भुमि अभिलेख, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
4) अपर तहसीलदार, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
5) अर्जदार लिलाधर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा. श्री. संजय शामलाल व्यास, रा. पहाडसिंगपुरा ता. जि. औरंगाबाद यांना माहितीस्तव.
6) तलाठी, साझा पदमपुरा, ता. जि. औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

(रामेश्वर रोडगे)
उपविभागीय अधिकारी
औरंगाबाद